महाराष्ट्र स्टेट इलेक्टीसिटी ट्रान्समिशन कंपनी लि
अऊदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था विभाग जळगाव 425-003

क्र काअ / स्थापत्य / तांत्रिक / जळगाव / No 058    दिनांक 18 JAN 2022

प्रति

-----------------------------
-----------------------------
-----------------------------

विषय :- अऊदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था उप विभाग धुळे -2 साठी टॅक्सी परमीट असलेले प्रवासी वाहन (डीझेल) भाडयाने घेणेबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी ट्रान्समिशन कंपनी लि अऊदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था उप विभाग धुळे -2 साठी परमीट असलेले प्रवासी वाहन (डिझेल) भाडयाने घेण्यासाठी जाहिर कोटेशन मागविण्यात येत आहेत त्याचा संपुर्ण तपशिल व अटी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | प्रत्येक दिवसाचा भाडयाने देण्याचा दर | वाहन भाडयाने घेण्याचा कालावधी प्रत्यक्ष वाहन चालल्याचे दिवस | रककम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 01 | परमीट असलेले प्रवासी वाहन (डिझेल) भाडयाने देणेबाबत सदर वाहन सन २०१८ किंवा त्यानंतरचे असावे प्रत्येक महिन्याला वाहनाचा वापर अंदाजे 3000 कि.मी होईल कमी जास्त वापर झाल्यास कोणताही जादा आकार मिळणार नाही वाहनासाठी लागणारे इंधन, हायस्पीड डिझेल कंपनीतर्फे पुरविण्यात येईल इंधनाचा वापर सरासरी 16 कि.मी. प्रति लिटर डिझेल (टाटा इंडीकासाठी) पेक्षा कमी नसावा. अन्यथा यापेक्षा सरासरी वापर कमी असल्यास म्हणजे इंधनाचा वापर जास्त झाल्यास वरील सरासरी धरुन फरकाची रक्कम बीलातुन कपात करण्यात येईल वाहनाचा वापर कमीत कमी 12 तास राहील जास्त वापर झाल्यास कोणताही जादा आकार मिळणार नाही. वाहनासोबत परवानाधारक वाहन चालक पुरवावा लागेल. वाहन चालकाचा पगार व इतर भत्ते तसेच वाहनाचा घसारा व आवश्यक त्या दुरुस्तीचा खर्च व इतर कुठलाही खर्च इंजिन ऑईल व गिअर ऑइलसह कंपनीकडुन देण्यात येणार नाही. | रुपये<br>प्रति दिवस | २४० दिवस (01 वर्ष) | |

अटी व शर्ती :-

1. भाडयाने घेण्याच्या वाहनाचे मॉडेल सन २०१८ किंवा त्यानंतरचे व सुस्थितीत असावे. वाहनासाठी आर.टी.ओ. कर, इन्शुरन्स, प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र इ. बाबी परिपुर्ण असाव्यात अन्यथा सदर निविदा नाकारण्यात येतील.
2. कोटेशन सादर करतांना खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति सादर कराव्या लागतील,
   अ. आर.सी. / टी.सी. बुकची झेरॉक्स प्रत.
   ब. आर.टी.ओ. परवान्याची प्रत
   क. वैध विमा प्रमाणपत्र
   ड. प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र.
   ई. ड्रायव्हरच्या ड्रायव्हींग लायसन्सची प्रत
3. सदर वाहनाचा वापर आवश्यक्तेनुसार सर्व महाराष्ट्रात होईल.
4. वाहन विद्युत पारेषण कंपनीत कार्यरत असेपर्यन्त कोठल्याही प्रकारची जोखीम किंवा जबाबदारी कंपनावर राहणार नाही
5. मुख्यालय सोडुन जातांना किंवा इतर ठिकाणी वाहन नादुरुस्त झाल्यास पर्यायी वाहनाची व्यवस्था आपणास स्वखर्चाने करावी लागेल अन्यथा ट्रान्समिशन कंपनीच्या नियमाप्रमाणे किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
6. वाहनाचा वापर साधारणतः सकाळी 9 ते संध्याकाळी 9 वाजेपर्यन्त करण्यात येईल त्याच्या व्यतिरिक्त जरी जादा वापर झाल्यास कोणताही जादा आकार कंपनीतर्फे देण्यात येणार नाही.
7. वाहनाची नोंद वहीत रोजच्या रोज वापर केल्याप्रमाणे नोंद घेवुन त्याचा कंपनीच्या संबंधीत अधिकारी किंवा त्यांच्या प्रतिनिधीच्या सहया घ्याव्या लागतील व ती नोंदवही बीलासोबत या कार्यालयाकडे सादर करावी लागेल.
8. वाहनाचे बील विभागीय कार्यालयात 5 तारखेच्या आत तिन (03) प्रतित सादर करावे लागेल बीलाची रक्कम रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात येईल. नियमाप्रमाणे आयकराची कपात आपल्या बीलातुन करण्यात येईल.
9. कोटेशन सादर करतांना इसारा रक्कम रुपये ५०००-00 रोख भरणा करणे अनिवार्य आहे ईसारा रक्कम न भरल्यास कोटेशन फेटाळण्यात येईल.

10 ऑर्डर दिलेल्या तारखेपासुन ऑर्डरची मुदत संपेपर्यन्त वाहन कंपनीच्या ताब्यात राहील दुरुस्ती सोडुन इतर कोणत्याही कामासाठी कार्यकारी अभियंता (स्था) जळगाव यांच्या पुर्वपरवानगी शिवाय वाहन हलविता येणार नाही.

11 प्रत्येक महिन्याच्या दर रविवारी साप्ताहीक सुटी समजुन त्या दिवशी वाहनाचा वापर शक्यतो होणार नाही आकस्मिक कारणावरुन / कारणास्तव रविवारी सुध्दा वाहनाचा वापर झाल्यास त्या दिवसाचे भाडे देण्यात येईल. तसेच ज्या दिवशी वाहन वापरले जाणार नाही त्या दिवसाचे भाडे देण्यात येणार नाही.

12 वाहन भाडयाने देण्याचा कालावधी जरी २४० दिवसांचा असला तरी कंपनीचे वाहन उपलब्ध झाल्यास 24 तासाची पुर्वसुचना देवुन बंद करण्यात येईल व वर्क ऑर्डर संपुष्टात आणण्यात येईल व त्याबद्दल कुठलाही दावा मान्य करण्यात येणार नाही.

13 वाहनाचा कुठल्याही प्रकारचा आघात किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी वाहन चालक किंवा वाहन मालकावर राहील कंपनी याबाबत जबाबदार राहणार नाही.

14 वाहनासंबंधी विमा, वाहन परवाना, आर टी ओ प्रवासी परवाना वाहन कर भरल्याचे प्रमाणपत्र, वाहन नोंदणी प्रमाणपत्र व वाहनाची सर्व कागदपत्रे पुर्ण असल्याची जबाबदारी आपणावर राहील तसेच सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रति झेरॉक्स प्रति सोबत जोडाव्यात वाहनाचे काही कागदपत्र अपुर्ण राहील्यास ती जबाबदारी आपली राहील आर.टी.टो च्या नियमावलीचे पालन न झाल्यास विद्युत कंपनी उदभवणा-या प्रसंगास जबाबदार राहणार नाही किंवा कसल्याही प्रकारचा दंड भरणार नाही व आर टी ओ नियमावलीचे कोटेकोरपणे पालन करण्याचे सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.

15 वाहन कंपनीच्या सेवेत असतांना झालेल्या कोणत्याही स्वरुपाच्या अपघात संदर्भात कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सर्व प्रकारच्या नुकसान भरपाईसाठी रक्कम अदा करण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील. कंपनी त्यास कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

16 वाहन चालकाच्या बाबतीत अपघात नुकसान भरपाई रक्कम वेतन इ बाबतीत कंपनी जबाबदार राहणार नाही

17 सर्व अटी व शर्तीचा काळजीपुर्वक अभ्यास करावा नंतर कुठलीही सबब व तक्रार ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी .

18 आपण मागणी केलेला दर हे सर्व्हीस टॅक्ससह अंतर्भुत असावा, नियमानुसार लागु होणारा सर्व्हीस टॅक्सची कपात आपल्या बीलातुन करण्यात येईल. [TDS]

19 याबाबतीत सर्व खटले जळगाव न्यायालयाअंतर्गत राहतील.

20 कोणतीही किवा सर्व कोटेशन कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार खाली स्वाक्षरी करणारांनी राखुन ठेवला आहे.

21 सदर वाहनाचे सुपुर्ण दर नमुद केलेले आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतिसह सही केलेले व सिलबंद कोटेशन या कार्यालयात दिनांक २७.०१. २०२२ रोजी दुपार 13.00 वाजेपर्यन्त स्वतः किंवा प्रतिनिधी मार्फत सादर करावे. दिनांक २७.०१. २०२२ रोजी दुपारी 3.00 वाजेनंतर पोस्टाने प्राप्त झालेले कोटेशन रद्द करण्यात येईल. प्राप्त कोटेशन दिनां_२७.०१. २०२२ रोजी या कार्यालयात दुपार 15-00 वाजेनंतर उपस्थित राहु इच्छिणा-या निविदाकारांसमोर उघडण्यात येतील.

आपला विश्वासु,

कार्यकारी अभियंता (स्था)
जळगाव

निविदाकाराची सही व शिक्का

पत्ता ----------------------------------
--------------------------------------
---------------------------------------

प्रत माहितीसाठी

1. उप कार्यकारी अभियंता (स्था) जळगाव उप विभाग क्र 2
2. उप व्यवस्थापक (विवले) जळगाव
3. नोटीस बोर्ड

महापारेषण

## e कोटेशन सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कार्यकारी अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था विभाग जळगांव हे अति कार्यकारी अभियंता (स्थापत्य) स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था उपविभाग धुळे-१ साठी प्रवासी वाहन भाडयाने घेण्यासाठी खालील अटी व शर्तीवर जाहिर कोटेशन मागविण्यात येत आहे. (१) भाडयाने द्यावयाचे वाहन टाटा इंडिका तथा तत्सम प्रवासी वाहन असावे (टी मार्क) (२) वाहनाचे मॉडेल सन २०१७ किंवा त्यानंतरचे असावे तसेच सुव्यस्थीत असावे (३) वाहनासाठी वैध प्रवासी परवाना असावा. (४) इतर कर व विमा वगैरे अदा केलेले असावे (५) वाहन भाडयाने देण्यासाठचे विहित नमुन्यातील कोरे दर पत्रक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कपंनीच्या वेब साईट वरुन दिनांक २०.१.२०२२ ते २७.१.२०२२ पर्यंत डाऊनलोड करुन घेण्यात यावे (६) भाडयाने दयावयाच्या वाहनाचे मालक विद्युत पारेषण कंपनीच्या कर्मचा-यांशी संबंधित नसावे (७) कोरे कोटेशन डाऊनलोड करुन घेतल्यानंतर त्यातील सर्व अटी व शर्तीचा व तसेच जी.एस.टी. सह तत्सम सर्व करांचा काळजीपुर्वक विचार व अभ्यास करुनच वाहन मालकाने भाडयाने देण्याच्या वाहनांचा दर नमुद करावा, कोणत्याही कारणास्तव त्या दराचा नंतर फेरविचार करण्यात येणार नाही. (८) पुर्ण दर नमुद केलेले कोटेशन वाहन मालकाने त्यांच्या सही शिक्क्यासह व संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रतीसह दि. २७.१.२०२२ रोजी १३.०० वाजेपर्यंत इसारा रक्कम रु. ५०००.०० रोख किंवा डिमांड ड्राफ्ट प्रत्येकी सह सादर करावे. सदरहु काटेशन दि. २७.१.२०२२ रोजी १५.०० वाजता उपस्थित राहु ईच्छीणा-या वाहन मालकाच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. कोणतेही कारण न दर्शविता कोणतेही किंवा सर्व कोटेशन नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (स्थापत्य ) विभाग जळगांव यांच्याकडे आरक्षित आहे.

(सुमंत मुंडे)
कार्यकारी अभियंता (स्था)
अउदा स्था.बां. तथा सुव्यवस्था
विभाग जळगांव